बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १७१ वा | सोमवार दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### बॅटऱ्या अज्ञाताने चोरल्या

धाराशिव (प्रतिनिधी)- भुम पोलीस ठाणे अंतर्गत दि.०३.०९.२०२५ रोजी हाडोंग्री शिवारातील जिओ टावर क्र एमएच बीएच ओएम ईएनबी ९०४३ येथे बॅकअप करीता बसविलेल्या दोन व्हिजन कंपनीच्या १०० एएचच्या बॅटऱ्या अंदाजे १०,००० किंमतीच्या अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- वैभव अरुण सुरव-से, २६ वर्षे, रा. सावर-गाव ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१२.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पोल वरील विद्युत ताराची चोरी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०५.०९.२०२५ रोजी भोसगा शिवारातील शेत गट नं २४८ मधील सुयोग उर्जा व टाटा पावर रिन्यएबल एजर्नी कंपनीचे पोल वरील विद्युत तारा १३०० मिटर लांबीच्या अंदाजे ६५,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- संतोष बाळकृष्ण निकम, वय ४५ वर्षे, रा.प्लॅट क्र ६ शर्मदा गार्डन व्यंकटपुरा पेठ सातारा ह.मु. दाळींब ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.११.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूर बसस्थानकात सोन्याच्या गंठणाची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी संगिता महावीर कंदले, वय ४५ वर्षे, रा.व्होर्टी ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि. ११.०९.२०२५ रोजी .तुळजापूर ते जळकोट कडे जाण्यासाठी तुळजापूर बसस्थानक येथे उमरगा बस मध्ये चढत असताना अज्ञात महिलेने संगिता कंदले यांचे गळ्यातील १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण अंदाजे ४०,००० किंमतीचे गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संगिता कंदले यांनी दि.११.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

येरमाळा (प्रतिनिधी)- अपोलीस ठाणे अंतर्गत सतिश, अमोल रा. शिराळा ता. बार्शी जि. सोलापूर हे दि.१२.०९.२०२५ रोजी येरमाळा जवळ येरमाळा ते बार्शी रोडलगत अंदाजे ७०,००० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ५९ सिलबंद बाटल्या सह स्कुटी क्र एमएच १२ आरएस २४३० अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे

## उत्साहात शांततेच्या वातावरणमध्ये जुलूस मिरवणूक संपन्न; उपविभागीय पोलीस निरीक्षकांचा सत्कार



मुरूम (रामलिंग पुराण)- ईद-ए-मिलाद निमित्त धाराशिव शहरात दिनांक ८ सप्टेंबर रोजी उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात भव्य जुलूस मिरवणूक संपन्न झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या मिरवणुकीत मुस्लिम बांधवांसह विविध समाजघटकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. मिरवणुकीदरम्यान धार्मिक संदेश, सामाजिक बांधिलकी व ऐक्याचा संदेश देणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. शहरातील नागरिकांनी ठिकठिकाणी स्वागत करून मिरवणुकीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला या प्रसंगी ईद-ए-मिलाद कमिटीच्या वतीने उपविभागीय पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांचा सत्कार करण्यात आला. कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी पोलिसांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल नागरिक व कमिटी पदाधिकाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

संपूर्ण मिरवणूक उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात पार पडली असून, पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. यावेळी जुलुस कमिटीचे अध्यक्ष इरशाद, मसूद शेख, अझहर पठाण, वाजिद पठाण, शाहनवाज सय्यद, कलीम कुरेशी, अस्लम मुजावर, नौमान रजवी, अरबाज नदाफ उपस्थित होते.

## मलकापूर जि.प. शाळेमधील स्वच्छतागृहांची दुरवस्था



धाराशिव (प्रतिनिधी)- कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत अनेक दिवसांपासून स्वच्छतागृह नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे.

तालुक्यातील मलकापूर येथे जिल्हा परिषदेची ४ थी पर्यंत शाळा असून येथे दोन शिक्षक कार्यरत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून या शाळेमध्ये मुलां मुलींसाठीच्या स्वच्छतागृहांची पडझड झाल्याने ते वापरात नसल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. २०१६-१७ मध्ये लाखो रुपये खर्चून मुलां -मुलींना स्वतंत्र स्वच्छतागृह आणि मुतारींचे बांधकाम केले होते. त्या दिवसापासून पाण्याअभावी त्यांचा वापर विद्यार्थ्यांना करता आला नाही. त्याचबरोबर शाळेमध्ये अनेक भौतिक सुविधांचाही अभाव आहे. शाळेतील काही वर्गखोल्यांची पडझड झाली आहे. दरवाजे, खिडक्या, कडी- कोंडे, लोखंडी गेट खराब अवस्थेत आहेत. किचन शेड अवस्थाही त्याच पद्धतीची असल्याने विद्यार्थांसाठीचे अन्न शाळेच्या दुसऱ्या खोलीत शिजवले जात आहे.

शाळेत बोअरवेल नसल्याने विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी ग्रामपंचायतच्या पाण्याच्या टाकीवर अवलंबून रहावे लागत आहे. एका बाजूने सर्व सुख सुविधांनी युक्त अशा खाजगी शाळांच्या स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या शाळेतील पट संख्या वाढावी यासाठी विविध शिक्षक संघटना पुढे येऊन काम करत आहेत आणि दुसऱ्या बाजूने विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा देण्यात शासन अपयशी ठरत असेल तर शिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यावर प्रतिकुल परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरी प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी पालकवर्गातून मागणी केली जात आहे.

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात रोजगार महामेळावा संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन , प्लेसमेंट आणि प्रशिक्षण केंद्राच्या वतीने टीसीएस आणि बी पी एस कंपन्यांचा रोजगार महामेळावा संपन्न झाला.

यावेळी या मेळाव्यासाठी ऑनलाइन पद्धतीने जवळपास १८० विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली होती. तर प्रत्यक्षात ९८ विद्यार्थी अभियोग्यता चाचणी आणि मुलाखतीसाठी उपस्थित होते.

सदर महामेळाव्यासाठी राहुल गिरी ,आदिती श्रीवास्तव,कौस्तुभ ठाणावाला ,योगेश पोतदार,अर्पिता महंता,हरीश साबळे,तुषार सोनगिरे एकूण सात सदस्य या रोजगार मिळण्यासाठी उपस्थित होते.

सर्वप्रथम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या पुतळ्याला आणि प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीप प्रज्वलन करून संस्था प्रार्थनेने कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्लेसमेंट विभागाचे प्लेसमेंट अधिकारी प्रा. डॉ.मारुती अभिमान लोंढे यांनी केले. यावेळी त्यांनी या प्लेसमेंट विभागाचा आणि स्पर्धा परीक्षा विभागाचा उद्देश स्पष्ट केला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री राहुल गिरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी त्यांनी मुलाखतीसाठी आलेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन करून निवड प्रक्रिया समजावून सांगितली.

सदर कार्यक्रमाच्या वेळी कौशल्य विकास व रोजगार केंद्राचे सहाय्यक आयुक्त श्री डी डी चव्हाण हे उपस्थित होते.त्यांनी देखील उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन करून स्पर्धा परीक्षा विषयी आपला अनुभव समोर ठेवला. मुलाखती विषयी सखोल माहिती श्री कौस्तुभ ठाणावाला ,आदिती श्रीवास्तव ,हरीश साबळे,तुषार सोनगिरे,अर्पिता महंता यांनी दिली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख हे होते.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. संदीप देशमुख म्हणाले की,महाविद्यालयामध्ये केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम केले जात नाही तर त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या रोजगाराची देखील तजबीज केली जाते. आणि त्याचाच एक भाग म्हणून हा रोजगार महामेळा होय.

अशा अनेक प्रकारच्या रोजगार महामेळाव्याचे आयोजन महाविद्यालयामध्ये केले जाते आणि विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त करून दिला जातो.त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असेही ते यावेळी म्हणाले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बालाजी गुंड यांनी केले तर आभार प्रा. माधव उगीले यांनी मानले.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## बंजारा समाजाच्या तरुणाची आत्महत्या!; हैदराबाद गॅझेटनुसार OBC ऐवजी ST आरक्षणाची मागणी



धाराशिव(प्रतिनिधी)- बंजारा समाजाला एसटी अर्थात अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी एका तरुणाने आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवल्याची दुःखद घटना धाराशिव जिल्ह्यात घडली आहे. जालना येथील बंजारा आरक्षण आंदोलनातून परतल्यानंतर या युवकाने हे पाऊल उचलले हे विशेष.

यासंबधीच्या माहितीनुसार, पवन गोपीचंद चव्हाण असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. तो धाराशिवच्या उमरगा तालुक्यातील मुरूम लगतच्या नाईकनगर येथील रहिवासी होता. तो शनिवारी सकाळी जिंतूरला जाण्याची तयारी करत होता. पण अचानक सकाळी ११ च्या सुमारास त्याने घरातील बांबूला गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना समोर आल्यानंतर घरात एकच रडारड सुरू झाली. स्थानिकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असताना त्यांना मयताच्या जवळ एक सुसाईड नोट आढळली.

**बंजारा समाजाला एसटी आरक्षण देण्याची मागणी**

या सुसाईड नोटमध्ये पवन चव्हाणने बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदीनुसार अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी केली होती. मा. मुख्यमंत्री साहेब बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट प्रमाणे अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण द्या, असे त्याने आपल्या सुसाईड नोटमध्ये लिहिले होते. पोलिसांनी ही नोट जप्त केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ३२ वर्षीय पवन चव्हाण हा पदवीधर बेरोजगार होता. त्याच्या पश्चात आई-वडील, पत्नी व एक मुलगा व एक मुलगी आहे. पवन दोन दिवसांपूर्वी जिंतूर येथे गोर सेना अध्यक्ष संदेश पवार यांच्या नेतृत्वात झालेल्या बंजारा समाजाच्या आरक्षण आंदोलनात सहभागी झाला होता. तो शुक्रवारीच नाईक नगरला परतला होता. तेव्हापासून तो अस्वस्थ होता. तो आपल्या मित्रांमध्ये सातत्याने एसटी आरक्षणाविषयी जनजागृती करत होता. त्यातच त्याने हे पाऊल उचलल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

**१५ तारखेला जालन्यात बंजारा समाजाचा मोर्चा**

उल्लेखनीय बाब म्हणजे राज्य शासनाने मराठा समाजला ओबीसी आरक्षण देण्यसाठी हैदराबाद गॅझेट लागू केले आहे. या गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा उल्लेख अनुसूचित जमाती म्हणून करण्यात आला आहे. त्यामुळे सध्या ओबीसी आरक्षणात येणाऱ्या बंजारा समाजाने आपल्याला आपल्या हक्काचे अनुसूचित जमातीचे आरक्षण द्यावे अशी मागणी केली आहे. या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी बंजारा कृती समितीने १५ सप्टेंबर रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या प्रकरणी शनिवारी जालन्यात एक बैठक झाली. त्यात या मोर्चाचे नियोजन करण्यात आले. आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लावता मूळ टक्केवारीतच बंजारा समाजाला एसटीचे आरक्षण द्यावे, अशी मागणी या समाजाने केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील आरक्षणाचा वाद चांगलाच चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## मोटरसायकलवरुन मागच्या मागेच रोडवर पडल्याने गंभीर जखमी होवून मयत

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गणेश व सोबत मयत नामे- बेबी राम कुंभार, वय ४५ वर्षे, रा. तावशीगाड ता. लोहारा जि. धाराशिव हे दोघे दि.३०.०८.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान गणेश यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून रामपुर पाटी उमरगा येथे रोडवरील खड्डा चुकवित असताना बेबी कुंभार या मोटरसायकलवरुन मागच्या मागेच रोडवर पडल्याने गंभीर जखमी होवून मयत झाल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राम गोरोबा कुंभार, वय ५५ वर्षे, रा. तावशीगड ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.११.०९.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम २८१, १२५(अ), १२५(ब), १०६(१) सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## धारासुर मर्दानीच्या महाआरतीत नीलम ताई गोऱ्हे यांच्या वाढदिवस साजरा



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव दिनांक ११ सप्टेंबर रोजी शिवसेना उपनेत्या तसेच विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम ताई गोऱ्हे यांचा वाढदिवस धाराशिव मध्ये महिला आघाडीच्या वतीने मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला महाराष्ट्रातील सर्व सामान्य महिलांसाठी संघर्ष करून पक्ष अधिक मजबूत करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नीलम ताईच्या कार्याचा गौरव करण्यासाठी धारासुर मर्दानी देवीची ओटी भरून व महाआरतीचा आयोजन करण्यात आले याप्रसंगी जिल्हा सहसंपर्क प्रमुख तसेच श्री तुळजाभवानी मातोश्री मंदिराचे प्रमुख भोपी पुजारी मंडळ अध्यक्ष अमर राजे कदम शहर प्रमुख संजय पप्पू मुंडे यांच्यासह विविध मान्यवर आणि देवीच्या महाआरतीत सहभागी होऊन नीलम ताईच्या दीर्घायुष्य व आरोग्यासाठी प्रार्थना केली युवा सेना तुळजापूर विधानसभा प्रमुख खंडू कुंभार महिला जिल्हा संघटक किरण ताई निंबाळकर आणि धडाडीच्या तालुकाप्रमुख मायाताई चव्हाण कांताबाई शिंदे सुनीता दराडे सविता माळी प्रतिभा पोद्दार श्रद्धा धारूरकर कुमारी पायल कुमारी श्रुती वनिता कांबळे जमिला तांबोळी हिरा कुंभार मनीषा लोखंडे रेणुका माने शितल माने मनीषा लाठे उर्मिला लाठे अर्चना मते शुभदा माने सुनिता माने शितल माने यासह शेकडो महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या हजर होत्या शिवसेनेच्या महिला पदाधिकाऱ्याने एक दिलाने सहभाग नोंदवल्यामुळे कार्यक्रमाला उत्सवी आणि धार्मिक वातावरण लाभले महिला आणि दिलेल्या उपस्थितीने संपूर्ण परिसरात शिवसेनेच्या संघटन शक्तीचा प्रत्यय येत होता डॉक्टर नीलम ताई यांच्या वाढदिवसानिमित्त झालेले हे आयोजन केवळ एक व्यक्तीचा वाढदिवस नसून महाराष्ट्रातील महिलांच्या सामर्थ्याच्या आणि शिवसेनेच्या बळकटीकरणाचा संदेश देणारा ठरला आहे

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शासनाने धोरण बदलावे ?

राज्याबरोबर देशात आरक्षणाची मागणी होत असते. काहीवेळा तणावाची स्थिती निर्माण होते. मुळात आपल्या देशात मागणी अधिक होते व देशासाठी त्याबदल्यात काय देतो का? याचा विचार केला जात नाही. त्यामुळे मागणीच दिसून येते. दिलेल्या सवलतीबाबत किती लाभाच्या आहेत किंवा त्यात सुधारणा किती करावयाची आहेत, याबाबत चिंतन होणे जरूरीचे आहे. मुळात देशात प्रत्येक व्यक्तींनी पैसाची साठवणुक किती करावी यावर विचार होत नाही. भ्रष्टाचाराबाबत चिंतन होत नाही. कोणी कितीही धन कमवा किंवा कोणत्याही कारणासाठी कमवा याबाबत सखोल विचार होणे अपेक्षित आहे. भ्रष्टाचार समाप्त झाला पाहिजे असे सर्वांना वाटते मात्र तो होत नाही उलट वाढ होते हे मान्यच केले जाते. देशात अनेकाकडे अमाप धन आहे. काही असे ही आहेत की, रात्रीचे पोटभर भोजन मिळत नाही. तसेच झोपतात. यावर चिंतन होत नाही. असो मुळ बाब सध्याला राज्या बरोबर काही देशात आरक्षण मिळावे याचीच मागणी होत आहे. मागणी करणे हा लोकशाहीने दिलेला अधिकार आहे मात्र लोकशाहीने देशासाठी काही योग्य करावे अशाही संदेश दिला आहे त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे सरकारने वेळीच काही निर्णय बदलाची गरज आहे. काही बाबीत सुधारणा केली पाहिजे. ती म्हणजे शिक्षण व आरोग्य या केवळ दोनच बाबी मोफत केल्या पाहिजे. या दोन बाबीसाठी प्रत्येकजन पैसा वैध किंवा अवैध मार्गाने कमविला जात आहे. आरोग्य व शिक्षण मोफत केले तर पैसाची हवा कमी होईल परिणामी भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होणार आहे. हे करणे सोपे आहे. ते जर काही वर्षासाठी केले, एक प्रयोग म्हणून केले तर याचा परिणाम सकारात्मक दिसून येवू शकेल. सध्याला शिक्षणासाठी व आरोग्यासाठी अधिक धन लागत आहे. या दोन बाबीकडे सरकारचे लक्ष नाही. आरोग्यसेवा देणारे किती कमावत आहेत. त्या बदल्यात किती कर देत आहेत. पावती देतात का? आरोग्याचा अमाप खर्च सांगून पैसा उकळतात. मेला तरी ऑक्सीजन लावुन पैसे उकळणारे असतात अशा घटना वृत्तपत्रातून पाहावयास मिळात ही एक वस्तूस्थिती आहे. मुळात आरक्षण शिक्षणासाठी हवे की अन्य बाबीसाठी! शिक्षण हे 'वाघीणीचे दुध आहे जो पिणार तो गुरगुरायाला लागणार' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. सरकारचे कर्तव्य आहे की, सर्वांना मोफत शिक्षण देणे. आज लहान मुल शाळेत पहिल्यावर्गात प्रवेशासाठी हजारोंची फी मोजावी लागते. ड्रेस असो किंवा अन्य खरेदी करणे जनसामान्यांना परवडणारे नाही. त्याबाबीकडे सरकारचे लक्ष नाही असे नाही. त्यांना माहितीही असेल. असे जरी असले तरी जे शिक्षण सम्राट आहेत ते कोण आहेत? किंवा कोणाचे शिक्षण संकुले आहेत? या बाबत विचार केला तर ते कळून येतील. त्यामुळे पहिला निर्णय सर्वांना मोफत शिक्षण व सर्वांना मोफत आरोग्य सुविधा दिल्या तर आरक्षण कोणी मागणार नाही किंवा भ्रष्टाचार कोणी करणार नाही. सध्याला काय होत की, शिक्षणासाठी पैसा नोकरीसाठी पैसा, सर्वत्र पैसा लागत असेल तर पैसा कमविण्यासाठी एकमेव शॉर्टकट मार्ग हा भ्रष्टाचार आहे ही बाब कोणालाच्या लक्षात येणारी आहे. आरक्षण का मागत आहेत किंवा आज पर्यंत दिलेल्या आरक्षणा बाबत मुल्यमापन प्रामाणिक झाले का? झाले असेल तर तो आवाहल सर्वांना माहिती करून दिला पाहिजे. एक आंदोलन देशात झाले तर किती पैसा, वेळ व त्याला संरक्षण देण्यात वाया जातो याचा विचार केला पाहिजे. देशात नोकऱ्या किती उपलब्ध आहेत किंवा दरवर्षी सेवानिवृत्त होणाऱ्याची संख्या किती आहे. त्याच प्रमाणे नोकऱ्यासाठी लागणाऱ्याची संख्या दरवर्षीची गरज किती? याचा विचार केला पाहिजे. आरक्षण असताना काही समाजातील मुला-मुलींचे वय निघून जात आहेत. त्यात सरकारने कायम स्वरूपी नौकरी नाही तर कॉट्रॅक्टबेस म्हणजे जेवढे काम करा दिवसाला ठराविक मोबादला दिला जात आहे. मराठीत गुत्तेपद्धत म्हटली तर वागवे ठरू नये. त्यात डेलीवेजवर तणखा! काम असेल व काम केले तर पगार मिळणार, काम नसेल तर घरी बसा! असाच होतो ना... त्यापेक्षा घराचा व्यवसाय केलेले बरा किंवा स्वत:च्या शेतात राबले तर वाईट नाही. एक बाब लक्षात येते जे अहिंदू आहेत. ते आरक्षणाबाबत आडूनबसत नाही. तिव्र आंदोलन करीत नाहीत. मिळेल ते काम करतात. कामाला लाजणारा समाज नाही. या बाबत विचार झाला पाहिजे. काही कामाबाबत तो सक्षम दिसून येतो. फ्रुट, असो बांधकाम क्षेत्रात असो किंवा अन्य क्षेत्रात त्याच्याशिवाय दुसऱ्याचा नंबर दिसून येत नाही. याला स्वावलंबन असेही म्हणतात. केवळ मागत राहाणे तेही वयनिघून जाण्यापर्यंत मागणे योग्य नाही. सरकारतरी कोणाकोणाला सरकारी नोकऱ्या देणार! एक संगणक बऱ्याच लोकांचे काम करीत आहे. माणसाची विज्ञानयुगात गरज कमी आहे. हे लक्षात घेता नोकऱ्या बरोबर उद्योग व्यवसायात सहभाग घेतला पाहिजे. नोकऱ्या नाहीत ते देऊ शकत नाही तर उद्योग व्यवसायाला चालना दिली पाहिजे. बँका आर्थिक व्यवसायात ज्यांचे वजन आहे त्यांना मदत करते. बाकींच्याना नाही. कारण बाकींच्यावर भरोसा किंवा विश्वास कमी बसतो. ही एक वस्तूस्थिती आहे. त्यामुळे प्रत्येकांनी आता धोरणात बदलाची गरज आहे. सरकार बरोबर नागरिकांनी विचार बदलण्याची गरज आहे. मुळात सध्याला काय होत तर विचार करीत नाहीत. पक्के नियोजन होत नाही. ज्यांच्या मागणीचा जोर त्यांच्याच मागणीस प्राधान्य दिले जाते. प्रत्येकजन आपली ताकद दाखवित आहेत. त्यामुळे सरकारने काही बाबीचा सखोल विचार केला पाहिजे. तातडीची गरज कोणती आहे. तातडीने कोणत्या प्रश्नाची सोडवणुक करावयाची आहे. ती केली पाहिजे. आज देशात एक प्रयोग म्हणून दोन बाबीचा विचार केला पाहिजे. एक आरोग्य व शिक्षण सुविधा मोफत करा. सर्व जाती व समाजासाठी ती लागू करा. सक्तीने शिक्षण द्या. जेवढ्या आरोग्य सुविधा आहेत त्यावर कठोर नियंत्रण ठेवा. पर्यायाने मोफत देण्यात भाग पाडा. जर आरोग्य व शिक्षण मोफत केल्यास कोणी आरक्षण मागेल किंवा पगार वाढ मागेल असे होणार नाही. त्याच प्रमाणे भ्रष्टाचारास मोठ्या प्रमाणात आळा असेल. एक प्रयोग म्हणून या बाबीचा विचार झाला पाहिजे.

# राज्यस्तरीय वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे उद्‌घाटन

## समाजाच्या शेवटच्या घटकाच्या विकासासाठी प्रसारमाध्यमांची साथ आवश्यक - सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने पत्रकारांना सन्मानित करण्याचा निर्णय लवकरच**




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय विभाग हा समाजातील तळागाळातील घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेला शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाने हाती घेतलेल्या समाज हिताच्या विविध योजना आणि उपक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमांची साथ अत्यावश्यक असल्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. समाज कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी यावेळी जाहीर केले.

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोनदिवसीय बैठकीचे उद्‌घाटन शनिवारी पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे होते. यावेळी आमदार प्रशांत बंब, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माहिती व जनसंपर्क संचालक (वृत्त - जनसंपर्क) तथा समितीचे सदस्य सचिव किशोर गांगुर्डे, राज्य समितीचे सदस्य आणि विभागीय माहिती उपसंचालक उपस्थित होते.

लोकशाहीमध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. चांगले काम जनतेपर्यंत पोहोचवणे आणि चुकीच्या गोष्टींना आरसा दाखवणे, हे काम प्रसारमाध्यमे करतात. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने अनेक चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. या विभागामार्फत राज्यात नवीन १२० वसतिगृहे उभारण्याचे प्रयत्न सुरू असून, आतापर्यंत ४८ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. समाजातील विषमतेची दरी कमी करून सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, यासाठी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसोबत एकत्रित प्रवेश देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळे विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होईल, असा उद्देश असल्याचे पालकमंत्री श्री. शिरसाट यांनी सांगितले.

सामाजिक न्याय विभागामार्फत समाजकल्याणासाठी सकारात्मक बदल घडविण्यासाठी पावले उचलली जात आहेत. योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि वंचित घटकांच्या विकासाला गती देण्यासाठी प्रसारमाध्यमांनी सकारात्मक साथ द्यावी, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले. समाज कल्याण क्षेत्रात, विशेषतः अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते. यापुढे या क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांनाही या पुरस्काराने गौरवण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**योजनांच्या अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची: मंत्री अतुल सावे**

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ अशी प्रसारमाध्यमांची ओळख आहे. आजही समाजाला दिशा देण्याचे आणि शासनाच्या योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रसारमाध्यमे करतात. योजनांबाबत जनतेच्या प्रतिक्रिया मांडणे आणि आवश्यक बदल सुचवणे यातही प्रसारमाध्यमांची भूमिका मोलाची आहे. त्यामुळे शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी सांगितले. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी माहिती दिली.

**सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीत पत्रकारांचा सहभाग घ्यावा: यदु जोशी**

सामाजिक न्याय आणि इतर मागास बहुजन कल्याण विभाग समाजातील मोठ्या घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. शासनाच्या प्रतिमानिर्मितीत या विभागांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे या विभागांच्या योजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी विभागीय स्तरावर स्वतंत्र समिती स्थापन करून त्यात पत्रकारांचा सहभाग घेतल्यास योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल, असे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी सांगितले. तसेच, अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रसारमाध्यमांमुळे लोकशाही बळकट झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तंत्रज्ञानाचे चांगले बदल तसेच काही दुष्परिणामही दिसत आहेत. याबाबत प्रसारमाध्यमांनी समाजाला मार्गदर्शन करून येणाऱ्या आव्हानांची जाणीव करून द्यावी, असे मत आमदार प्रशांत बंब यांनी व्यक्त केले.

प्रसारमाध्यमांमुळे प्रशासकीय कामकाजात सकारात्मक बदल घडतात, असे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी नमूद केले. तसेच, हुंडाबळी, बालविवाह, गर्भलिंग निदान आणि स्त्री-भ्रूण हत्या यासारख्या चुकीच्या प्रथांना आळा घालण्यासाठी प्रसारमाध्यमांनी पुढाकार घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

प्रारंभी माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक किशोर गांगुर्डे यांनी प्रास्ताविकात बैठकीच्या आयोजनाची भूमिका विशद केली आणि पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष डॉ. माधव सावरगावे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी केले.

## विद्यार्थ्यांची एक भेट आयुक्तासोबत; मनपा शिक्षण विभागाचा उपक्रम





**लातूर/प्रतिनिधी :** या उपक्रमांतर्गत लातूर शहर महानगरपालिका सावित्रीबाई फुले मनपा शाळा क्रमांक ०९, मंठाळे नगर मधील जुलै महिन्यात झालेल्या गुणवत्ता चाचणीतील इयत्ता ८ वी व ९ वीतील पहिल्या दहा विद्यार्थ्यांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली होती.या मुलांना महानगरपालिकेत भेटीसाठी बोलावून स्वतः आयुक्त मानसी व अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांनी मुलांचे पुष्प देऊन स्वागत केले. या प्रसंगी सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. महादेव साठे यांनी महानगरपालिकेतील २१ विभागांची कार्यप्रणाली पीपीटीद्वारे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. आयुक्तांनी तब्बल तीन तास सर्व विभागाच्या कार्यपद्धती बद्दल सविस्तर संवाद साधला.

विशेष म्हणजे, प्रत्यक्ष विद्यार्थ्याना आयुक्तांच्या खुर्चीवर बसवून कामकाजाचा अनुभव देण्याची संधी दिली. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाच्या जबाबदाऱ्या प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळाली.तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छता राखणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, पाण्याचा अपव्यय न करणे, विजेची बचत करणे व वृक्षलागवड करणे या पंचसूत्रीबद्दल मार्गदर्शन केले.

उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी घेतलेल्या या अनुभवाचे स्वहस्तलिखित अहवाल तयार करण्यास सांगितला. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

या विशेष भेटीतून विद्यार्थ्यांना नागरी प्रशासनाबद्दल प्रत्यक्ष ज्ञान मिळाले असून उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राष्ट्रीय पालक विश्रांती दिन : पालकांच्या त्यागाला विश्रांतीचा सन्मान

मानवजातीच्या उत्क्रांतीत कुटुंबसंस्था ही सर्वात प्राचीन, शाश्वत आणि मूलभूत संस्था मानली जाते. समाजशास्त्रज्ञांच्या मते कुटुंब हेच समाजाचे मूलभूत एकक आहे, ज्यातून संस्कृती, परंपरा, सामाजिक मूल्ये, आचार-विचार आणि भावनिक बंध तयार होतात. समाजाचे शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत अस्तित्व टिकवून ठेवण्यामागे कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून या कुटुंबसंस्थेचे प्रमुख स्तंभ म्हणजे पालक आहेत. आई-वडील हे केवळ मुलांना जन्म देणारे नसतात, तर ते त्यांच्या आयुष्याचे पहिले शिल्पकार असतात. आई-वडील हेच मुलांच्या संगोपनाचे, संस्कारांचे आणि सुरक्षिततेचे प्राथमिक आधारस्तंभ आहेत. मुलांच्या संगोपनात, शिक्षणात, संस्कारांत, करिअरच्या प्रवासात, विवाह व स्थैर्य मिळविण्यात पालक सतत मुलांच्या पाठीशी उभे राहतात. त्यांचा त्याग, कष्ट आणि समर्पण अमूल्य असते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे मुलांमध्ये चारित्र्य, जबाबदारीची जाणीव, संस्कृतीची परंपरा आणि समाजाशी जोडलेले मूल्य विकसित होतात. मात्र, या अखंड प्रयत्नांच्या प्रवास प्रक्रियेत पालक अनेकदा स्वतःचा त्याग करतात, आपली स्वप्ने बाजूला ठेवतात, स्वतःच्या आयुष्याकडे, आरोग्याकडे, विश्रांतीकडे दुर्लक्ष करतात आणि आयुष्याचा मोठा भाग कुटुंबासाठी समर्पित करतात. म्हणूनच पालकांच्या या त्यागाची जाणीव करून देत त्यांच्या आरोग्याला, मानसिक समाधानाला आणि सामाजिक योगदानाला सन्मान देण्यासाठी 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' ही संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाची ठरते.

समाजशास्त्रीय दृष्टीने विश्रांतीचे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे. विश्रांती म्हणजे फक्त शारीरिक आराम नव्हे, तर मानसिक शांतता, आत्मपरीक्षणाची संधी, निसर्गाशी संवाद, छंद जोपासणे आणि भावनिक ऊर्जेचा पुनर्भरण हा त्याचा व्यापक अर्थ आहे. पालकांच्या आयुष्यातील दैनंदिन जबाबदाऱ्या इतक्या प्रखर असतात की त्यांना हे अनुभवायला वेळ मिळत नाही. परिणामी अनेकदा त्यांचे आरोग्य बिघडते, मानसिक तणाव वाढतो, कौटुंबिक नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो. अशा वेळी जर समाजाने पालकांना विश्रांतीचा दिवस दिला, तर तो त्यांच्यासाठी नव्या ऊर्जेचा श्वास ठरेल. समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती काही सामाजिक भूमिका पार पाडत असतो. पालकत्व ही अशी भूमिका आहे जी इतर सर्व भूमिकांपेक्षा अधिक व्यापक, गुंतागुंतीची आणि आजीवन असते. जन्मापासून ते प्रौढत्वापर्यंत मुलांच्या प्रत्येक टप्प्यावर पालकांची नवी जबाबदारी निर्माण होत राहते. मुलांचे शिक्षण, संस्कार, सुरक्षितता, रोजगारासाठीचे मार्गदर्शन, विवाह, सामाजिक प्रतिष्ठा या सर्व टप्प्यांवर पालकांचे श्रम सतत गुंतलेले असतात. या श्रमांमध्ये विश्रांतीसाठी जागा अनेकदा राहत नाही. त्यामुळे 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा पालकांच्या भूमिकेला सामाजिक मान्यता देणारा आणि त्यांच्या थकव्याला समजून घेणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे.

आधुनिक जगात पालकांवर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. शहरी जीवनशैलीत सकाळपासून रात्रीपर्यंतच्या धकाधकीत नोकरी, वाहतूक कोंडी, घरगुती कामे, मुलांच्या अभ्यासाची काळजी, आर्थिक नियोजन आणि सामाजिक जबाबदाऱ्या यामुळे पालकांच्या अंगावर दुप्पट ताण येतो. ग्रामीण भागात शेतीतील अनिश्चितता, हवामान बदल, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी आणि पारंपरिक सामाजिक अपेक्षा या कारणांनी पालकांची झुंज अखंड सुरू असते. अशा परिस्थितीत पालकांना एक दिवस जाणीवपूर्वक विश्रांती देणे म्हणजे त्यांच्या आरोग्याला आणि मानसिक शांतीला नवा श्वास देणे होय. एक दिवस पालकांना दिलेली विश्रांती ही कुटुंबातील परस्पर सहयोगाची निशाणी आहे. मुलांनी एका दिवसासाठी पालकांची कामे आपल्या अंगावर घेतली, तर त्यांना पालकांच्या कष्टांची खरी जाणीव होईल. हे केवळ घरापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजातील एकात्मतेलाही बळकटी देते. यामुळे पालकांबद्दल आदर, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना मुलांच्या मनात अधिक दृढ होते. परिणामी, कुटुंबातील बंध अधिक घट्ट होतात आणि समाजातील परस्पर समन्वयही दृढ होतो. सतत श्रम करणाऱ्या व्यक्तीला आपल्या कार्याचे महत्त्व उमजेनासे होते आणि त्याला स्वतःपासून व समाजापासून वेगळे वाटू लागते. पालकांचे श्रमदेखील अनेकदा अदृश्य श्रम असतात. आईच्या घरगुती कामांना पगार नसतो, तर वडिलांच्या कष्टांनाही अनेकदा केवळ 'कर्तव्य' म्हणून पाहिले जाते. अशा परिस्थितीत 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' पालकांच्या अदृश्य श्रमांना मान्यता देतो, त्यांचा सन्मान करतो आणि त्यांना त्यांच्या सामाजिक योगदानाची जाणीव करून देतो.

आरोग्याच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत उपयुक्त आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, ताण, चिंता, नैराश्य, हृदयरोग यांसारख्या समस्या पालकांमध्ये वाढत आहेत. यामागे सततची जबाबदारी, आर्थिक ओझे आणि विश्रांतीचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. पालकांचे आरोग्य बिघडल्यास त्याचा परिणाम थेट मुलांच्या विकासावर व कुटुंबाच्या स्थैर्यावर होतो. त्यामुळे पालकांना विश्रांती देणे म्हणजे कुटुंबाच्या आरोग्याचे व समाजाच्या भविष्यातील सुरक्षिततेचे रक्षण करणे आहे.

लिंगभावसमतेच्या दृष्टिकोनातूनही या दिवसाचे महत्त्व मोठे आहे. भारतीय समाजात अजूनही आईवर घरकाम, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा जबाबदाऱ्यांचा डोंगर असतो. वडील घराबाहेर कष्ट करून आर्थिक भार पेलतात. या दोन्ही भूमिकांचा सन्मान करणे आणि विश्रांतीद्वारे त्यांना समान आधार देणे ही गरज आहे. 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' या संकल्पनेतून घरगुती कामांचे वाटप, जबाबदाऱ्यांचा समतोल आणि परस्पर सहकार्याची जाणीव वाढीस लागते. यामुळे लिंगभावभेद कमी होतो आणि समतेच्या मूल्यांना बळकटी मिळते.

तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात मुलांची जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यांत गुंतलेल्या मुलांना पालकांच्या त्यागाची खरी जाणीव होत नाही. या पार्श्वभूमीवर अशा दिवसांचे महत्त्व अधिक वाढते. मुलांनी पालकांसाठी स्वयंपाक करणे, घराची साफसफाई करणे, त्यांच्या छंदांमध्ये वेळ घालवणे किंवा फक्त त्यांच्यासोबत संवाद साधणे यामुळे पालकांना मानसिक समाधान मिळते आणि मुलांमध्ये जबाबदारीची जाणीवही दृढ होते. या दिवसाचे औपचारिकतेत रूपांतर न होता तो खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळ होण्यासाठी शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि माध्यमे यांनी पुढाकार घ्यायला हवा. शाळांमध्ये पालकांविषयी कृतज्ञतेची निबंध स्पर्धा, वादविवाद, नाटिका यांचे आयोजन करता येईल. स्वयंसेवी संस्थांनी पालकांचा सन्मान करणारे कार्यक्रम घ्यावेत. माध्यमांनी पालकांच्या संघर्षांच्या प्रेरणादायी कथा समाजापर्यंत पोहोचवाव्यात. यामुळे समाजात पालकांविषयी आदराची जाणीव वाढेल आणि 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' एक व्यापक चळवळ बनेल. समाजशास्त्रज्ञांच्या मते, कुटुंबसंस्था ही समाजाच्या प्रगतीची पायाभूत रचना आहे. पालक हे त्या रचनेचे प्रमुख स्तंभ आहेत. त्यांना विश्रांती देणे म्हणजे या स्तंभांना बळकट करणे आणि समाजाच्या भविष्यासाठी मजबूत पाया घालणे होय. म्हणून 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा दिवस केवळ एक उत्सव नाही, तर पालकत्वाचा गौरव करणारा, मूल्यांचा पुनर्विचार घडवणारा आणि सामाजिक ऐक्याला बळकट करणारा उपक्रम आहे.

आजच्या वेगवान जीवनात पालकांना स्वतःसाठी वेळ काढणे फार कठीण झाले आहे. ते मुलांच्या भविष्यासाठी झटत असतात, स्वतःच्या इच्छा-आकांक्षा अनेकदा बाजूला ठेवतात. त्यामुळे त्यांना एक दिवसाची विश्रांती देणे ही केवळ कौटुंबिक नव्हे, तर सामाजिक जबाबदारी आहे. पालकांचे समाधान, त्यांचे आरोग्य आणि आनंद यातूनच मुलांचे सुरक्षित बालपण, कुटुंबातील ऐक्य आणि समाजाची प्रगती घडते. म्हणूनच 'राष्ट्रीय पालक विश्रांती दिन' हा दिवस पालकांच्या त्यागाचा सन्मान करणारा, कुटुंबसंस्थेचा उत्सव साजरा करणारा आणि भावी पिढ्यांना कृतज्ञतेचा अमूल्य धडा शिकवणारा ठरतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्र आणि वृद्धत्त्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२

# पोट साफ होत नसेल तर सकाळी करा हा उपाय...





मुंबई: आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत बद्धकोष्ठता ही एक सामान्य समस्या बनली आहे. चुकीचा आहार, अपुरी झोप आणि बैठी जीवनशैली यामुळे अनेक लोक या समस्येने त्रस्त आहेत. सकाळी पोट व्यवस्थित साफ न झाल्यामुळे दिवसभर अस्वस्थता जाणवते. पण यावर एक सोपा आणि प्रभावी उपाय आहे - रात्री झोपण्यापूर्वी मनुका खाणे.


मनुके खाण्याचे फायदे:
बद्धकोष्ठतेपासून आराम: मनुकामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते. हे फायबर आतड्यांच्या कार्याला चालना देते, ज्यामुळे शौच सुलभ होते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. आतड्यांचे आरोग्य: मनुकातील सॉर्बिटॉल नावाचा नैसर्गिक घटक आतड्यांमध्ये पाणी खेचून घेतो, ज्यामुळे मल मऊ होण्यास मदत होते. यामुळे सकाळी सहजपणे पोट साफ होते. पचन सुधारते: मनुका नियमित खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि पोटाचे आरोग्य चांगले राहते.

मनुका खाण्याची योग्य पद्धत:
रात्री भिजत घाला: रात्री झोपण्यापूर्वी ५-६ मनुके पाण्यामध्ये भिजत घाला.
सकाळी खा: सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी हे मनुके चावून खा आणि ते पाणी प्या. यामुळे पचनक्रिया अधिक वेगाने काम करते.
केवळ मनुकेच नाही तर सुक्या मेव्यामध्ये अंजीर, खजूर आणि जर्दाळू हे सुद्धा बद्धकोष्ठतेसाठी फायदेशीर आहेत. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि आतड्यांचे आरोग्य चांगले राहते. मात्र, कोणत्याही उपायाचा अवलंब करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे नेहमीच योग्य असते.

# वयाच्या चाळीशीनंतर पुरुषांनी फिट राहण्यासाठी जरूर खा या खालील गोष्टी

वयाच्या चाळीशीनंतर पुरुषांनी फिट राहण्यासाठी जरूर खा या ७ गोष्टी

मुंबई : सध्याच्या धावपळीच्या जीवनात आणि अनियमित जीवनशैलीमुळे अनेक पुरुषांना चाळीशीनंतर आरोग्याच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. वाढत्या वयानुसार शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होते आणि अनेक आजार होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत, आपल्या आहारात योग्य बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी चाळीशीनंतर पुरुषांनी कोणत्या पदार्थांचा आहारात समावेश करावा, याबद्दल तज्ज्ञ खालीलप्रमाणे काही महत्त्वाच्या गोष्टी सांगतात.१. अक्रोड: अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड, फायबर आणि मॅग्नेशियमसारखे अनेक पोषक घटक असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. ते मेंदूची कार्यक्षमता वाढवून स्मरणशक्ती



सुधारण्यास मदत करतात.
२. बेरी: स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी, रास्पबेरी अशा बेरीमध्ये भरपूर अँटिऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे असतात. हे पदार्थ रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि शरीरातील पेशींना हानीपासून वाचवतात.
३. लसूण: लसूण नैसर्गिकरित्या टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढवणारे अन्न आहे. यात ॲलिसिन नावाचा घटक असतो, जो रक्ताभिसरण सुधारतो आणि पुरुषांच्या लैंगिक आरोग्यास मदत करतो.
४. फ्लेक्स सीड्स (अळशीच्या बिया): फ्लेक्स सीड्समध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिडचे प्रमाण जास्त असते, जे मेंदू आणि हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. यात फायबर असल्यामुळे पचनसंस्थाही निरोगी राहते.५. पालक आणि हिरव्या पालेभाज्या: पालकामध्ये मॅग्नेशियम, लोह, पोटॅशियम आणि जीवनसत्त्वे असतात, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास आणि ऊर्जा वाढवण्यास मदत करतात. यामुळे स्नायूंचे आरोग्यही चांगले राहते.६. दही: दह्यामध्ये प्रोबायोटिक्स असतात, जे पोटाचे आरोग्य चांगले ठेवतात. तसेच, त्यात कॅल्शियम आणि प्रथिने असल्यामुळे हाडे आणि स्नायू मजबूत होतात.७. डाळी आणि कडधान्ये: डाळी आणि कडधान्ये प्रथिनांचा उत्तम स्रोत आहेत. चाळीशीनंतर स्नायूंची ताकद टिकवून ठेवण्यासाठी प्रथिने खूप महत्त्वाची असतात.

# मोदी सरकार महागाईचा जनतेला हादरा

रिटेल इन्फ्लेशन म्हणजे किरकोळ महागाईचा दर गेले नऊ महिने सातत्याने घसरत होता आणि लोकांनाही हायसे वाटले होते. पण ऑगस्टमध्ये किरकोळ महागाईच्या दरात वाढ झाली आहे आणि हा दर १.६१ टक्के इतका झाला आहे. हा दर किरकोळ वाटू शकतो, पण सध्या जनता ज्या महागाईच्या वणव्यात होरपळत आहे ते पाहता हा दर खूप जास्त आहे. सामान्यतः महागाईचा दर वाढला आहे ते हिरव्या भाज्या आणि मासे तसेच अंडी या आवश्यक वस्तूंच्या किमतीतील वाढीमुळे. नोव्हेंबर २०२४ पासून महागाईचा दर सतत कमी होत होता. पण ऑगस्ट २०२५ मध्ये मात्र अचानक तो वाढला. त्याला कारणे अर्थातच अर्थशास्त्रीय आहेत. आधीच्या उच्च बेस इफेक्टचा परिणाम कमी झाल्यामुळे ही वाढ नोंदवली गेली असा अर्थशास्त्रीय निष्कर्ष आहे, पण सर्वसामान्यांच्या भाषेत सांगायचे तर जनता अगोदरच महागाईने मेटाकुटीला आली होती, त्यात आता या किरकोळ महागाईमुळे ती जेरीस आली आहे. बेस इफेक्ट म्हणजे अगोदरच्या वर्षापेक्षा या वर्षीत किती किमती बदलल्या आहेत आणि त्या निकषावर महागाईचा फटका जास्त बसत आहे. महागाई चार टक्क्यांवर ठेवण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेला देण्यात आले होते. त्या निकषानुसार पाहिले असता हा महागाईचा दर सामान्यतः आटोक्यात आहे. पण जनतेला या विश्लेषणाची सवय नसते आणि तिला महागाईचे कारण काय याच्या कारणातही काहीही रस नसतो. त्यांना रस असतो तो महागाई किती आहे आणि कोणती स्वस्त वस्तू आहे आणि कोणती महाग आहे यातच. त्या दृष्टीने निश्चितच हा दर चिंताजनक आहे. यंदा पावसामुळे कित्येक धान्ये सडून गेली आहेत आणि कित्येक पिकं तर येण्याची शक्यताच दिसत नाही. या परिस्थितीत धान्य महागाई काही प्रमाणात का होईना पण वाढली आहे. मोदी सरकारसाठी ही भूषणावह बाब नाही. कारण मोदी यांनी सबका साथ सबका विकास असा नारा दिला होता आणि त्यामुळे ते सत्तेवर येताच जनतेला हायसे वाटले होते. काँग्रेसच्या काळात महागाईने कहर केला होता आणि साध्या गोष्टी जनतेच्या आवाक्याबाहेर गेल्या होत्या. मोदी सरकार सत्तेवर येताच जनतेला 'अच्छे दिन' आल्याची खात्री पटली होती. पण अचानक महागाईच्या दरात किरकोळ का होईना पण वाढ झाल्याचे दिसल्याने जनता त्रस्त आहे. त्यातच आगीत तेल ओतणारे विरोधक विशेष म्हणजे राहुल गांधी यांच्यासारखे विरोधक काँग्रेसचे नेते आणि शिवसेना उबाठाचे नेते याचा गैरफायदा घेणार यात काही शंका नाही. महागाईने अर्थव्यवस्थेवर




काय परिणाम होतो हे पाहिले असता असे लक्षात येते की महागाई ही बाजारात पैसा जास्त प्रमाणात आल्याने वाढते आणि पैसा कमी असल्यानेही वाढते. बाजारात पैसा जास्त झाला तर लोक हवी ती वस्तू मागेल त्या किमतीला खरेदी करतात आणि परिणामी महागाई वाढते. मोदी सरकार महागाईच्या बाबतीत पारदर्शक आहे आणि त्याने आकड्यांची कसलीही लपवालपवी केली नाही. ती काँग्रेसच्या काळात केली जायची. काँग्रेसने जो आरोप केला आहे, की गेल्या दहा वर्षांच्या काळात सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महागाईमध्ये सातत्याने भर पडली आहे. ती लोकांच्या रोषातून का व्यक्त होत नाही. कारण काँग्रेस खोटे बोलत आहे. जनता जर महागाईने त्रस्त असती तर मोदी सरकार कधीच उलथून पडले असते. पण जनता खुष आहे. त्यामुळे काँग्रेसचा दावा तकलादू आहे. पण हे निश्चित आहे की आता सणासुदीचे दिवस आहेत आणि त्यांच्या तोंडावर महागाईचा दणका जनतेला बसला आहे, खास करून भाज्या आणि अंडी वगैरेची दरवाढ तर असह्य आहे. मोदी सरकार यातून काही तरी उपाययोजना काढेल यात काही शंका नाही. पण ग्राहक किंमत निर्देशांकात सतत नऊ महिने घसरणीनंतर ही वाढ झाली आहे. याचा परिणाम म्हणजे ऐन सणासुदीत अनेक वस्तूंच्या विशेष करून खाद्य पदार्थांच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे ही वाढ चिंताजनक तर आहेच. यावर उपाय म्हणजे सरकारने त्वरित काही तरी तोडगा काढून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा ही मागणी रास्त आहे. आर्थिक बाबतीत आपले अज्ञान असल्यामुळे महागाई वाढली की सरकारच्या नावाने बोंब ठोकायची अशी विरोधकांना सवय झाली आहे.

ही महागाई सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे झालेली नाही. कारण या महागाईमुळे ग्राहकांसाठी वस्तूंच्या किमती आणि विशेष करून अन्नपदार्थांच्या किमती वाढू शकतात. हा परिणाम फारच नकारात्मक आहे आणि तो जास्त घातक आहे. १९९६ मध्ये दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत कांद्यांचे भाव चढले होते आणि त्यात सुषमा स्वराज सरकार याची आहुती पडली होती. तसे आता होणार नाही. पण मोदी सरकारने किरकोळही धोका पत्करण्याची तयारी दाखवू नये. कारण या किरकोळ महागाईमुळे रिझर्व्ह बँकेच्या धोरणात बदल होणार नसला तरीही जनतेला महागाईने पिडले आहे हे वास्तव नाकारून चालणार नाही. तेव्हा महागाईवर सामान्य जनतेला दिलासा देण्याचा विचार तर सरकारने करायलाच हवा. हवामान बदलाचा परिणाम महागाईवर जाणवतो आणि त्याचाच फटका जनतेला बसला आहे. ग्राहकाना विशिष्ट वस्तूसाठी अधिक किमतीचा सामना करावा लागेल. कॅस्केडिंग इफेक्ट म्हणतात तो म्हणजे या किंमत वाढीचा परिणाम इतर वस्तूंच्या किमतीवरही होईल आणि ग्राहकांना त्याचे जास्त दाम मोजावे लागतील. आरबीआयच्या चार टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा ही वाढ कमी असली तरीही ऐन सणासुदीच्या काळात अन्नधान्य आणि भाज्या यांच्या किमतीत वाढ होणे हे चिंताजनक आहे. सारांश काय तर सरकारला यावर काही तरी तातडीचा उपाय शोधणे आवश्यक झाले आहे. आता मोठ्या निवडणुका नसल्या तरीही जनतेच्या कल्याणासाठी सरकारने काम करायला हवे आणि तसे ते जनतेला दिसायला हवे. त्यानुसार महाराष्ट्र आणि मोदी सरकारे वागतील अशी आशा आहे. कोणतेही सरकार नेहमीच लोकांच्या रडारवर असते आणि त्यानुसार मोदी सरकार असणार. पण तसे होऊ न देण्याची खबरदारी मोदी सरकारने घ्यायला हवी. कारण मोदी यांनी अच्छे दिन आणण्याची ग्वाही दिली होती. ती त्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

## गरोदर स्त्रियांनी मीठाचं सेवन जास्त करू नये, कारण... डॉक्टर टीप्स



आई-बाबा व्हायचं आहे? ङ्गसेफफ एक पर्याय

आजही सामान्यतः गरोदर स्त्रियांना या काळात काय खावे आणि काय खाऊ नये या गोष्टी माहित नसतात. पण त्या माहित असायलाच हव्यात. जेणेकरून कोणताही धोका आई व बाळ दोघांना होणार नाही आणि ते या काळात सुरक्षित राहून अगदी योग्य पद्धतीने डिलिव्हरी होईल.

गरोदरपणात मीठ खाल्लं तर आरोग्यासाठी फायदेशीर असतच. परंतु मिठाचं अतिसेवन आरोग्यासाठी अपायकारक ठरू शकतं. जेवणात मिठाची चव नसेल, तर ते आपल्याला खूप निस्तेज वाटते. चवीसोबतच आरोग्यासाठी मीठ खूप महत्त्वाचे आहे. कारण त्यात सोडियम मुबलक प्रमाणात असते. सोडियम आपल्या शरीरातील पीएच आणि द्रव पातळी संतुलित करते. (**क्रमशः पुढील अंकात**)

## विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha....


## सुविचार



शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**
आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: साात्विकप्रिया : ।।
अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



## क्रीडा विश्व



# भारताने पाकड्यांना धुतले

## ७ विकेट राखत मिळवला विजय




दुबई: आशिया कप स्पर्धेतील सहाव्या सामन्यात भारताने पाकिस्तानवर जबरदस्त विजय मिळवला आहे. पाकिस्तानने पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतासमोर विजयासाठी केवळ १२८ धावांचे आव्हान ठेवले होते. भारताने पाकड्यांचे हे आव्हान ७ विकेट आणि २५ चेंडू राखत पूर्ण केले. सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना पाकिस्तानने २० षटकांत ९ बाद १२७ धावा केल्या होत्या.

पाकिस्तानचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या भारतीय संघाने दणक्यात सुरूवात केली होती. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्माने आल्यापासून पाकिस्तानच्या गोलंदाजांना झोडायला सुरूवात केली. तर गिलही तशाच प्रकारे धुवत होता. सलामीवीर शुभमन गिलच्या रूपात भारताला पहिला धक्का बसला. तो १० धावा करून बाद झाला. त्यानंतर अभिषेक शर्मा ३३ धावा करून बाद झाला. तिलक वर्मानेही ३१ धावांची खेळी केली. मात्र सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबेने शेवटपर्यंत टिकून पाकिस्तानला चारीमुंड्या चीत केले. कर्णधार सूर्यकुमार यादवने या सामन्यात नाबाद ४७ धावा ठोकल्या.

भारतीय संघाने चांगली सुरुवात करून पाकिस्तानला सुरुवातीचा धक्का दिले. हार्दिक पंड्याने सॅम अयुबला बाद केले आणि जसप्रीत बुमराहने मोहम्मद हरिसला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. पाच चेंडूत तीन धावा काढून हॅरिस बाद झाला. अशाप्रकारे पाकिस्तानने सहा धावांच्या मोबदल्यात दोन विकेट्स गमावल्या होत्या. सुरुवातीच्या अपयशानंतर फखर जमान आणि साहिबजादा फरहान यांनी पाकिस्तानचा डाव सांभाळला. या दोघांच्या फलंदाजीमुळे पॉवरप्लेच्या अखेरपर्यंत पाकिस्तानने दोन विकेटसाठी ४२ धावा केल्या. भारताने चांगली सुरुवात केली आणि पाकिस्तानला दोन धक्के दिले. पण फखर आणि साहिबजादा यांनी काही चांगले फटके मारून डाव सांभाळला.अक्षर पटेलने फखर झमानला बाद करून भारताला तिसरे यश मिळवून दिले.

फखर आणि साहिबजादा फरहान यांच्यात तिसऱ्या विकेटसाठी ३९ धावांची भागीदारी झाली. जेव्हा फखर आपले खातेही उघडू शकला नाही तेव्हा तो बुमराहच्या चेंडूवर एलबीडब्ल्यू झाला. पण त्याने रिव्ह्यू घेतला ज्यामुळे त्याला जीवनदान मिळाले. पण फखर भारतासाठी अडचणी निर्माण करू शकण्यापूर्वी तो अक्षरच्या चेंडूवर आऊट झाला. फखरने १५ चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने १७ धावा केल्या. अक्षर पटेलने पुन्हा एकदा भारताला यश मिळवून दिले आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आघाला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. आगा खाते न उघडताच एलबीडब्ल्यू झाला होता. पण त्याने रिव्ह्यू घेतला आणि त्याला जीवनदान मिळाले. पण तो याचा फायदा घेऊ शकला नाही आणि फक्त तीन धावा करू शकला. पाकिस्तानची सुरुवात चांगली झाली नाही आणि त्यांनी ४९ धावांवर चौथी विकेट गमावली. या सामन्यातील अक्षरची ही दुसरी विकेट ठरली. पाकिस्तानचा अर्धा संघ फक्त ६४ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने हसन नवाजला अक्षरने झेल देऊन पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. सात चेंडूत पाच धावा काढून हसन बाद झाला. कुलदीप यादवने आपली जोरदार गोलंदाजी सुरू ठेवली आणि पाकिस्तानला सातवा धक्का दिला. कुलदीपने चांगली फलंदाजी करणाऱ्या साहिबजादा फरहानला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. ४४ चेंडूत एक चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४० धावा काढून फरहान बाद झाला. ८३ धावांच्या धावांवर पाकिस्तानने सात विकेट गमावल्या. वरुण चक्रवर्तीने फहीम अशरफला बाद करून पाकिस्तानला आठवा धक्का दिला. फहीम १४ चेंडूत एका चौकाराच्या मदतीने ११ धावा काढून बाद झाला. अशाप्रकारे पाकिस्तानने ९७ धावांवर आठवा बळी गमावला.

जसप्रीत बुमराहने सुफियान मुकीमला बाद करून पाकिस्तानला नववा धक्का दिला. मुकीमने बुमराहच्या गोलंदाजीवर दोन चौकार मारले होते. पण १९ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर बुमराहने त्याला बाद केले. सहा चेंडूत १० धावा काढून मुकीम बाद झाला. आणि पाकिस्तानने २० षटकांमध्ये ९ विकेट्स गमावून १२७ धावा केल्या.

भारताकडून कुलदीप यादवने सर्वाधिक ३ गडी बाद केले. तर जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन विकेट मिळवले. पहलगाम हल्ला आणि त्यानंतर झालेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर दोन्ही देश खेळाच्या मैदानात आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ आहे. या सामन्यात पाकिस्तानने भारताविरुद्ध टॉस जिंकत पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. या स्पर्धेत भारताने पहिला सामना यूएईविरुद्ध खेळला होता. त्यात भारताने मोठ्या फरकाने विजय मिळवला होता. तर दुसरीकडे पाकिस्ताननेही ओमानविरुद्धच्या सामन्यात मोठ्या फरकाने विजय मिळवला होता. अशातच दोन्ही संघ आपला मागचा सामना जिंकून हा सामना खेळत आहेत.

## ...म्हणून सूर्याने पाकिस्तानी खेळाडूंशी हात नाही मिळवला, सांगितले हे कारण




मुंबई: आशिया कप २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यात भारताने ७ विकेट राखत विजय मिळवला. या सामन्यादरम्यान भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव आणि इतर भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला. या घटनेनंतर मोठी चर्चा झाली.

काय घडले नेमके?

नाणेफेकीदरम्यान हस्तांदोलन नाही: सामन्याच्या सुरुवातीला नाणेफेकीच्या वेळी, दोन्ही संघांचे कर्णधार, सूर्यकुमार यादव आणि सलमान अली आगा, यांनी एकमेकांशी हस्तांदोलन केले नाही. क्रिकेटमधील ही एक सामान्य परंपरा आहे, पण दोन्ही कर्णधारांनी ती टाळली.

सामन्यानंतरही हस्तांदोलन नाही: भारताने हा सामना जिंकल्यानंतर, सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे यांनी थेट ड्रेसिंग रूमकडे जाण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानचे खेळाडू हस्तांदोलनासाठी मैदानावर थांबले होते, परंतु भारतीय संघाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले आणि थेट ड्रेसिंग रूममध्ये निघून गेले.

हस्तांदोलन न करण्यामागचे कारण:सामन्यानंतर पत्रकार परिषदेत सूर्यकुमार यादवने यावर स्पष्टीकरण दिले. त्याने सांगितले की, 'जीवनात काही गोष्टी खेळाडूवृत्तीच्या पलीकडच्या असतात.' त्याने हा निर्णय पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या समर्थनार्थ घेतल्याचे सांगितले. भारतीय संघ हा विजय त्या हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबीयांना आणि भारतीय सैन्याला समर्पित करत असल्याचेही त्याने सांगितले. या घटनेमुळे, दोन्ही देशांमधील राजकीय तणावाचा परिणाम क्रिकेटच्या मैदानावरही दिसून आला. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (झउइ) यावर नाराजी व्यक्त केली, तर भारतीय खेळाडूंच्या या निर्णयाला देशातील अनेक लोकांनी आणि चाहत्यांनी पाठिंबा दिला.




**जपानमधील टोकियो येथे झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स अल्टीमेट चॅम्पियनशिपमध्ये पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस हीट्समध्ये स्पर्धा करताना खेळाडू.**

## थोडक्यात/ संक्षिप्त

### सूर्यकुमार यादवने पाकिस्तानच्या कर्णधाराला दिली खुन्नस

दुबई-भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात रविवार १४ सप्टेंबर रोजी आशिया कप २०२५ चा सहावा सामना खेळवला जात आहे. दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना खेळवला जात असून सामन्यापूर्वी दोन्ही संघांच्या कर्णधारांमध्ये टॉस पार पडला. हा टॉस पाकिस्तानचा कर्णधार सलमान आघाने जिंकला आहे. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर भारत - पाकिस्तान देशातील संबंध खूपच ताणले गेले. यानंतर प्रथमच भारत पाकिस्तानमध्ये क्रिकेट सामना खेळवला जातोय. टॉसच्यावेळी सुद्धा दोन्ही संघांचे कर्णधार एकमेकांना टशन देताना पाहायला मिळाले.

टॉसच्यावेळी काय घडले? टॉस दरम्यान, जेव्हा भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगा मैदानावर आले तेव्हा स्टेडियमवर उपस्थित चाहत्यांनी खूप आवाज केला. पण दोन्ही कर्णधारांनी एकमेकांशी नजरही मिळवली नाही किंवा हस्तांदोलनही केले नाही. दोघांनीही एकमेकांपासून अंतर ठेवले. पहलगाम हल्ल्यानंतर पहिल्यांदाच दोन्ही संघ क्रिकेटच्या मैदानात आमनेसामने आले आहेत. पाकिस्तानचा कर्णधार सलमान आघाने टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताला प्रथम गोलंदाजीचे आव्हान मिळाले. दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्वाचा सामना : १४ सप्टेंबर रोजी होणारा सामान हा भारत - पाकिस्तान या दोन्ही संघांसाठी महत्वाचा असणार आहे. याचं कारण म्हणजे भारताने १० सप्टेंबर रोजी यूएई विरुद्ध सामना खेळला यात त्यांनी ९ विकेटने विजय मिळवला. तर पाकिस्तानने ओमानवर ९३ धावांनी विजय मिळवला. भारत पाकिस्तान संघ एकाच ग्रुपमध्ये असून सध्या त्या दोघांचेही एक - एक पॉईंट्स झाले आहेत. आता जो संघ रविवारचा सामना जिंकेल त्यांचे सुपर ४ मध्ये पोहोचण्याचे चान्सेस वाढतील. भारत आणि पाकिस्तानचे संघ : भारताची प्लेईंग ११: अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव(कर्णधार), टिळक वर्मा, संजू सॅमसन(विकेटकिपर), शिवम दुबे, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती

# भारत-पाक सामन्यासाठी अवघा तास शिल्लक असताना गौप्यस्फोट

दुबई-आशिया कपमधील भारत-पाकिस्तान सामन्यावरुन संपूर्ण देशभरात मते व्यक्त केली जात आहेत. दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानविरोधात भारताने खेळू नये असं अनेकांचं मत आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडित कुटुंबांनीही आपलं मत परखडपणे मांडलं असून, भारताने हा सामना खेळू नये असं म्हटलं आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या जखमा ताज्या असतानाच भारत पाकिस्तानविरोधात खेळत असल्याने विरोधकांनीही केंद्र सरकारला धारेवर धरलं आहे. या सामन्याबाबत, असा युक्तिवादही केला जात आहे की भारतीय संघ सुरेश रैना, हरभजन सिंग, शिखर धवन, युवराज सिंग, इरफान पठाण, युसूफ पठाण यांसारख्या अनुभवी वरिष्ठ खेळाडूंनी वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स (डब्ल्यूसीएल) मध्ये जे केलं होतं ते आता का केलं जात नाही? ते असे का करत नाहीत? सध्याच्या संघाचे खेळाडू बहिष्कार घालू शकत नाहीत का?पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ, इंडिया चॅम्पिअन्सने वर्ल्ड चॅम्पियन्स लिगमध्ये पाकिस्तान चॅम्पिअन्स संघासोबत सामना खेळण्यास नकार दिला. त्या भारतीय संघाचा भाग असलेल्या स्टार क्रिकेटर सुरेश रैना सध्याचा




भारतीय संघ असं का करत नाही? असा प्रश्न विचारण्यात आला.

'आज तक'शी साधलेल्या संवादात रैना म्हणाला की, खरंतर, सरकारने संपूर्ण प्रकरणात मान्यता दिली आहे. बीसीसीआयने (भारतीय क्रिकेट नियामक मंडळ) दोन्ही देश केवळ बहु-राष्ट्रीय स्पर्धामध्येच एकत्र खेळतील असंही स्पष्ट केलं आहे. दोन्ही देशांमध्ये कोणतीही द्विपक्षीय मालिका होणार नाही. आमच्या बाबतीत, ही एक प्रकारे खासगी मालिका होती, सर्व वरिष्ठ खेळाडू त्यात खेळत होते, जे बीसीसीआयच्या अंतर्गत येत नाहीत. अशा परिस्थितीत, आमच्या संघातील सर्व खेळाडू हरभजन सिंग, शिखर धवन, युवराज सिंग, इरफान पठाण, युसूफ पठाण आणि इतर सर्वांनी पाकिस्तानसोबत सामना न खेळण्याचा निर्णय घेतला होता.

पुढे म्हणाला की, ''आशिया कप ही एक बहुराष्ट्रीय स्पर्धा असल्याने ती एसीसी (आशियाई क्रिकेट परिषद) अंतर्गत येते. अशा परिस्थितीत भारतीय संघ हा सामना खेळत आहे. लक्षात ठेवा की गेल्या काही वर्षापासून आयसीसी (आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद) स्पर्धामध्ये भारत आणि पाकिस्तान एकमेकांविरोधात खेळत आहे''.

'चिन्नाथला' नावाने प्रसिद्ध असलेला रैना म्हणाला, ''मला हे चांगलंच माहिती आहे की जर टीम इंडियाच्या खेळाडूंना आशिया कपमध्ये खेळण्याबद्दल वैयक्तिकरित्या विचारलं असतं, तर कोणीही आशिया कपमध्ये खेळलं नसतं. एकंदरीत, ही एक प्रकारची सक्ती आहे कारण बीसीसीआयने याला मान्यता दिली आहे. तसंच ही एसीसी स्पर्धा आहे. रैनाने यावेळी असंही म्हटलं की भारत पाकिस्तानसोबत खेळत आहे याचे त्याला दु:ख आहे. मला हे चांगलेच माहित आहे की जर सूर्याच्या नेतृत्वाखाली आशिया कप खेळणाऱ्या भारतीय संघातील कोणत्याही सध्याच्या खेळाडूला पाकिस्तानसोबत सामना खेळण्याबद्दल त्याचे वैयक्तिक मत विचारले गेले असते तर त्याने नकार दिला असता असा विश्वास व्यक्त केला.

## ४ सप्टेंबर पाकिस्तान कधीच विसरणार नाही, क्रिकेटच्या मैदानात भारताने दिली भळभळती जखम

मुंबई-भारत-पाकिस्तान यांच्यात आज म्हणजेच १४ सप्टेंबर २०२५ ला आशिया कपमध्ये मॅच होणार आहे. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारत-पाकिस्तान सामना होऊ नये, अशी मागणी अनेक भारतीयांनी केली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात टीम इंडिया पाकिस्तानविरुद्ध खेळण्यासाठी दुबईच्या मैदानात उतरणार आहे. भारतीय क्रिकेटसाठी १४ सप्टेंबर हा दिवस खूपच खास आहे, कारण याच दिवशी भारताने पाकिस्तानला भळभळती जखम दिली होती. पाकिस्तानसाठी १४ सप्टेंबर हा दिवस वाईट स्वप्नासारखाच आहे.

क्रिकेटच्या मैदानात भारत-पाकिस्तान हे सगळ्यात जुने कट्टर प्रतिस्पर्धी आहेत. दोन्ही देशांमधल्या वाढत्या तणावामुळे दोन्ही देश फक्त आशिया कप आणि टी-२० स्पर्धामध्ये एकमेकांविरुद्ध खेळताना दिसतात. १४ सप्टेंबरला भारत-पाकिस्तान पहिल्यांदाच आमने-सामने येत नाहीयेत. याच तारखेला दोन्ही देशांमध्ये २००७ टी-२० वर्ल्ड कपचा सामना खेळवला गेला होता. या सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केला होता, पण भारताने ही मॅच रन किंवा विकेटने नाही तर बॉल आऊटने जिंकली होती.

टी-२० वर्ल्ड कप २००७ मध्ये भारत-पाकिस्तान यांच्यात ग्रुप स्टेजची मॅच खेळवली गेली. या सामन्यात भारताने पहिले बॅटिंग करत २० ओव्हरमध्ये ९ विकेट गमावून १४१ रन केले, त्यामुळे पाकिस्तानला विजयासाठी १४२ रनचं आव्हान मिळालं. या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानने ७ विकेट गमावून १४१ रनच केले, त्यामुळे कोणतीच टीम जिंकली नाही. टी-२० वर्ल्ड कपमध्ये पहिल्यांदाच अशी स्थिती निर्माण झाली, त्यामुळे आयसीसीच्या नियमांनुसार टाय झालेल्या मॅचचा निर्णय बॉल आऊटने निश्चित केला गेला. ज्यात भारतीय बॉलरनी पहिल्या तीनही बॉलवर स्टंप उडवले, पण पाकिस्तानच्या एकाही बॉलरना स्टंप उडवता आले नाहीत, त्यामुळे हा सामना भारताने जिंकला. टीम इंडियासाठी हा विजय महत्त्वाचा होता, कारण पुढे जाऊन टी-२० वर्ल्ड कपच्या फायनलमध्येही भारताने पाकिस्तानला धूळ चारली.

# भारत-पाकिस्तान सामन्यावर बीसीसीआयचा बहिष्कार?

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान संघात रविवारी (१४ सप्टेंबर) दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर आशिया कप २०२५ स्पर्धेतील सामना होणार आहे. हा सामना सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांतील संबंध अत्यंत बिघडले आहेत. भारतातील अनेकांनी या सामन्याला विरोध करताना या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर हा सामना होत आहे.

मात्र आता असे समोर येत आहे की, बीसीसीआयकडून 'अदृश्य बहिष्कार' या सामन्यावर टाकण्यात येणार आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (इउउख) पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्याचा बहिष्कार करण्याचा विचार केला आहे. अलीकडेच झालेल्या पहलगाव दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातून हा सामना रद्द करण्याची मागणी होत आहे. बीसीसीआय (इउउख) चे कुठलेही वरिष्ठ अधिकारी अद्याप दुबईला पोहोचलेले नाहीत. पहलगाव हल्ला आणि त्यानंतरच्या ऑपरेशन सिंदूरमुळे निर्माण झालेल्या संवेदनशील परिस्थितीचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे.




सचिव देवजीत सैकिया हे महिला वनडे विश्वचषकाच्या तयारीत व्यस्त असल्याने सामन्याला उपस्थित राहणार नाहीत.



आयपीएल चेअरमन अरुण धूमल यांनीदेखील दुबईला न जाण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र,



### मॅचमध्ये दिसणार नाहीत बोर्डाचे वरिष्ठ अधिकारी

कार्यकारी अध्यक्ष राजीव शुक्ला, जे एशियन क्रिकेट कौन्सिल (-उउ)चे सदस्य आहेत, ते या सामन्यात उपस्थित राहू शकतात. तसेच, आयसीसी चेअरमन जय शहा हे अमेरिकेत महत्त्वाच्या बैठकींमध्ये व्यस्त असल्याने दुबईत येणार नाहीत. सरकारच्या निर्णयावर बीसीसीआय अवलंबून बीसीसीआय अनेकदा स्पष्टपणे सांगत आलं आहे की, पाकिस्तानविरुद्ध खेळायचं की नाही हे पूर्णपणे भारत सरकारच्या भूमिकेवर अवलंबून आहे. यापूर्वीही भारताने पाकिस्तानमध्ये होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचा बहिष्कार केला होता. त्यावेळी स्पर्धा हायब्रिड मॉडेलवर घेण्यात आली होती आणि भारताने आपले सर्व सामने यूएईत खेळले होते.

भारत आणि पाकिस्तान टी-२० मध्ये कोण वरचढ?आशिया कप टी-२० स्वरूपात खेळला जात आहे. आतापर्यंत दोन्ही संघांनी १७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ज्यामध्ये भारताने १० सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानने फक्त तीन वेळा विजय मिळवला आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की टी-२०मध्ये भारताची थोडीशी आघाडी आहे, ज्यामुळे भारतीय संघाला मानसिक फायदा देखील मिळतो.

## भारत विकास परिषदेतर्फे केशवराजमध्ये गुरुवंदन व छात्र अभिनंदन कार्यक्रम संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** येथील भारत विकास परिषद सिद्धेश्वर शाखा लातूरतर्फे दि. १३ सप्टेंबर २०२५ शनिवार रोजी केशवराज माध्यमिक विद्यालयात गुरुवंदन व छात्र अभिनंदन कार्यक्रम संपन्न करण्यात आला. याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तसेच भारत विकास परिषदेतील सिद्धेश्वर शाखेचे प्रमुख जगदीश वारद, ज्येष्ठ सदस्य सर्वोत्तम कुलकर्णी, तसेच इतर सदस्य बालाजी बिरादार, विलास आराध्ये व पर्यवेक्षिका इंदू ठाकूर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली .

याप्रसंगी भारत विकास परिषद सिद्धेश्वर शाखा, लातूरतर्फे मंचावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील संगीत शिक्षक संतोष बीडकर, विद्यार्थ्यांकडून भगवद्गीता मुखोद्गत करून घेणाऱ्या शिक्षिका कांचन तोडकर व शैला जेऊरकर तसेच विद्यालयातील विस्तार कार्य समिती प्रमुख महादेव गोंदरकर या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयातील दहावी गुणवंत विद्यार्थी कु. संतोषी सूर्यवंशी व चि. ऋतुराज माडे तसेच गायन, वादन, क्रीडा, चित्रकला व रांगोळी क्षेत्रात नैपुण्यप्राप्त विद्यार्थी कु. अपूर्वा पाटील, चि. संमीहन जोशी, चि. विघ्नेश जोशी, कु. आराध्या कदम, कु. शांभवी हाजगुडे कु. समीक्षा देवने, कु. नयन बडगिरे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी यांनी परिश्रम घेतले.

## मध्य रेल्वे दसरा आणि दिवाळी २०२५ उत्सवादरम्यान सोलापूर विभागामार्गे कोल्हापूर-कलबुरगि दरम्यान विशेष गाडीच्या ११६ फेऱ्या चालवणार



**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने येत्या दसरा आणि दिवाळी उत्सवाच्या हंगामात प्रवाशांच्या सोयीसाठी कोल्हापूर आणि कलबुरगि दरम्यान सोलापूर विभागामार्गे कोल्हापूर-कलबुरगि दरम्यान विशेष गाडीच्या ११६ फेऱ्या चालवणार आहे.

खालील तपशीलांमध्ये हे समाविष्ट आहे:

कोल्हापूर-कलबुरगि विशेष गाडी (११६ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०१४५१ कोल्हापूर-कलबुरगि विशेष गाडी २४.९.२०२५ ते ३०.११.२०२५ पर्यंत दररोज (शुक्रवार वगळता) सकाळी ०६.१० वाजता कोल्हापूरहून निघतील आणि त्याच दिवशी दुपारी ०४.१० वाजता कलबुरगि येथे पोहोचेल. (५८ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०१४५२ कलबुरगि-कोल्हापूर स्पेशल कलबुरगि येथून २४.९.२०२५ ते ३०.११.२०२५ पर्यंत दररोज संध्याकाळी १८.१० वाजता (शुक्रवार वगळता) निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०५.४० वाजता कोल्हापूरला पोहोचेल. (५८ फेऱ्या)

थांबे: हातकणंगले, जयसिंगपूर, मिरज, अरग, बेलांकी, सलगरे, कवठेमहांकाळ, लंगरपेठ, ढालगांव, जत रोड, मसोबा डोंगरगांव, जवळे, वासूद, सांगोला, पंढरपूर, मोडनिंब, कुर्डुवाडी आणि सोलापूर.

रचना: ४ AC-III टियर, ६ स्लीपर क्लास, ६ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ सामान्य द्वितीय श्रेणी कम गार्डची ब्रेक व्हॅन. (१८ डबे)

आरक्षण आणि बुकिंग:

विशेष शुल्कासह गाडी क्र. ०१४५१ व ०१४५२ या विशेष गाड्यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर दिनांक १६.०९.२०२५ पासुन उघडेल.

अनावश्यक डब्यांचे बुकिंग स्थानकांवरील बुकिंग काउंटर आणि णढड ॲपद्वारे देखील करता येईल. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात आली आहे.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

# एकाच दिवशी ९०० थकबाकीदार मालमत्ताधारकाकडून तब्बल ३ कोटीहून अधिक कर संकलन

## लोकअदालत सह शास्ती माफी योजनेस प्रचंड प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर शहर महानगरपालिका लातूर यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीस थकबाकीदार मालमत्ताधारक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.दिनांक १३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत चे आयोजन मनपा मुख्यालय येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री एस.जे.भारुका, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर श्री वी.एन. गिरवलकर व मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी(भा.प्र.से) यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले होते. सदरील लोकअदालात येथे पॅनल प्रमुख म्हणून श्री पी एम शिंदे निवृत्त जिल्हा न्यायाधीश व वकील प्रतिनिधी म्हणून ॲड. श्री आशिष पोळ यांनी काम पाहिले व यात ६००० थकबाकीदार मालमत्ता धारकाना नोटीस बजावण्यात आली होती त्यापैकी ९०० थकबाकीदार यांनी तडजोड करण्यात आली.

महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकाकडून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संपूर्ण कर वसुली करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी कर संकलन विभागास दिले होते. त्यादृष्टीने उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभाग वर्षाच्या सुरुवाती पासूनच टॅक्स वसुलीच्या दृष्टीने विविध उपक्रम/योजना राबवित आहे. त्यानुसार मालमत्ता धारकाना विविध सूट/सवलती देण्यात आले होते. सोबतच थकबाकीदार मालमत्ता धारक यांच्याकडील थकीत कराची रक्कम पाहता ही प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालत मधे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याकरिता ८०% शास्ती माफी सुद्धा लागू करण्यात आली होती. तसेच सदर योजना एक दिवसासाठी संपूर्ण मालमत्ताधारकासाठी लागू करण्यात आली होती. त्यामध्ये लोकअदालत सोबतच शहरातील इतर थकबाकीदार असे मिळून तब्बल ९०० हून अधिक थकबाकीदार मालमत्ता धारकाकडून एकाच दिवसात ३ कोटी चा कर संकलन करण्यात कर विभाग यशस्वी झाला आहे.. ८०% शास्ती माफी योजना व लोक अदालत मधे अधिकाधिक नागरीकाना सहभागी होता यावे या दृष्टीने कर अधीक्षक श्री प्रतीक मुसंडे, क्षेत्रीय अधिकारी संतोष लाडलापुरे , बंडू किसवे, समाधान सूर्यवंशी,विजय राजुरे यांच्यासह सर्व कर पर्यवेक्षक व वसुली लिपिक यांनी अथक परिश्रम घेतले.

सदरील सुट ला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून लोकअदालत सह क्षेत्रीय कार्यालयात नागरिकानी टॅक्स भरणा करण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.उर्वरीत थकबाकीदार यांनी आपला थकीत टॅक्स भरून महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे.

## शहरात राबवली जाणार गोवर रूबेला लसीकरण मोहीम – आयुक्त श्रीमती मानसी



**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील सर्व शासकीय/ विनाअनुदानित/अनुदानित आश्रम शाळा व मदरसा येथील पाच ते पंधरा वयोगटातील मुला मुलींना १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान गोवर रूबेला लसीची मात्रा देण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या अध्यक्षतेखाली सिटी टास्क फोर्स बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

सदर बैठकीमध्ये आयुक्त श्रीमती मानसी यांनी शासन स्तरावरून प्राप्त उद्दिष्ट १००% पुर्ण करणे बाबत सूचना दिल्या. सदर बैठकीस लातूर शहरातील मदरसा यांचे संचालक, आय एम ए अध्यक्ष डॉ अभय कदम, आय ए ए पी अध्यक्ष डॉ बजाज, स्त्री रुग्णालयातील डॉ नारागुडे, जागतिक आरोग्य संघटनेचे सर्विलन्स मेडिकल ऑफिसर डॉ गायकवाड, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती, महापालिकेचे आरसीएच ऑफिसर डॉ श्यामा जाधव तसेच नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

अशी असणार आहे गोवर रूबेला लसीकरण मोहीम

१. लसीकरण सत्रात एकूण सहा कर्मचाऱ्यांचा समावेश त्यामध्ये १ वैद्यकीय अधिकारी १ ए एन एम, १ स्टाफ नर्स, ३ अशा स्वयंसेविका, असे एकूण सहा जणांचा एक चमू लसीकरणाचे कामकाज पाहणार आहे.

२. प्रामुख्याने ५ ते १५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना या लसीची एक मात्रा दिली जाणार आहे.

३. एक लसीकरण सत्रा मध्ये १५० मुलांना लसीची मात्रा देण्यात येणार आहे ४. केवळ प्रशिक्षित व्यक्तीच लसीकरण सत्रामध्ये लस देणार आहेत.

शहरातील एकही पात्र बालक या लसीपासून वंचित राहणार नाही असा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

शाळेतील शिक्षक, पालक यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून मोहीम यशस्वी करण्याकरिता सहकार्य करावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांनी केले आहे.

## भारतीय जैन महिला संघटनेच्या वतीने गुरुदक्षिणा अंतर्गत शिक्षक दिनानिमित्य शिक्षीकांचा गौरव





**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जैन महीला संघटनेच्या वतीने लातूर शहरातील मुलींची शाळा गोदावरी माध्यमिक व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता कासार जैन यांचा भारतीय जैन संघटने च्या वतीने अध्यक्षा सौ. त्रिशला शहा यांनी शाल श्रीफळ ट्रॉफी देऊन सत्कार केला व शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी मोना शहा , अनिता शहा , शोभा कोंडेकर. सौ नंदा ओस्तवाल, सौ सुरेखा बेदमुथा , श्रीदाशु छाजेड, प्रेक्षा जैन, श्रुती जैन,मंगल कर्नावट राजुल शहा व या संघटनेच्या कार्यकारणी सदस्या महीला उपस्थित होत्या

कन्हेरी येथे शिक्षिकेंचा गौरव भारतीय जैन संघटना गुरु दक्षिणा अंतर्गत शिक्षक दिना निमित्ताने लातुर भारतीय जैन महीला संघटनेच्या वतीने शहरातील गुरुकुल शाळेतील ( कन्हेरी ) लातुर येथील २२ शिक्षिकेंचा गुच्छ व गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार करुन यावेळी उपस्थित शिक्षिका सोबत विविध खेळ खेळून त्यांचा आनंद द्विगुणित करुन सर्वांनी आनंद ऊपभोगला यावेळी संघटनेच्या पदाधिकारी ऊपस्तीत होत्या

## श्री एस. डी. बोखारे (माजी कार्यकारी संचालक) यांची डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड



**लातूर/प्रतिनिधी :** साखर उद्योगातील अग्रगण्य संस्था असलेल्या द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी मांजरा परिवारातील साखर उद्योगात कार्यरत राहिलेले उत्कृष्ट कार्यकारी संचालक एस.डी. बोखारे यांची बहुमताने निवड झाली आहे. २०२५ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी ही निवड झाली असून, त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

श्री. एस.डी. बोखारे यांना साखर कारखान्यांमध्ये एकूण ४५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. या काळात त्यांनी केमिस्ट, व्यवस्थापकीय संचालक (मॅनेजिंग डायरेक्टर), तांत्रिक संचालक (टेक्निकल डायरेक्टर) आणि व्यवस्थापन सल्लागार अशा विविध पदांवर काम केले आहे. त्यांची ही निवड दोन प्रतिस्पर्धकांमध्ये झाली. एकुण झालेल्या मतापैकी उत्कृष्ट कार्यकारी संचालक एस.डी. बोखारे यांना १९ मते मिळाली. तर डॉ. मोहन डोंगरे यांना ० शुन्य मते मिळाली. यापूर्वी, श्री. एस.डी. बोखारे यांनी २०२२ ते २०२५ या कालावधीत या संसथेवर उपाध्यक्ष (तांत्रिक) म्हणूनही काम पाहिले आहे.

श्री. एस.डी. बोखारे यांचा गौरवशाली प्रवास:

श्री. बोखारे यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत बी. टेक., डी. एस.सी.सी., जी.डी.सी.ए. आणि एल.एल.बी. यांसारख्या पदव्यांचा समावेश आहे. आपल्या ४५ वर्षांच्या व्यावसायिक अनुभवात त्यांनी १९८१ ते २००० या काळात पूर्णा आणि मांजरा सहकारी साखर कारखान्यात विविध पदांवर काम केले. त्यानंतर २००० ते २०१५ पर्यंत त्यांनी विलास सहकारी साखर कारखान्यात व्यवस्थापकीय संचालक म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. त्यांनी विविध तांत्रिक शोधनिबंध सादर केले आहेत, ज्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

विविध पुरस्कारांनी सन्मानित:

सन १९९७ मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट मुख्य केमिस्ट पुरस्कार आणि २०१३ मध्ये सर्वोत्कृष्ट व्यवस्थापकीय संचालक पुरस्कार प्रदान करण्यात आला. साखर उद्योगातील त्यांच्या योगदानाबद्दल २०२२ मध्ये त्यांना डी. एस.टी.ए.ने आजीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले.

त्यांनी भारत सरकार आणि विविध विद्यापीठांच्या अनेक महत्त्वाच्या समित्यांवर प्रतिनिधित्व केले आहे. एस.टी.ए.आय., डी.एस.टी.ए. आणि एस.आय.एस.एस.टी.ए. सारख्या अनेक तांत्रिक संघटनांचे ते आजीवन सदस्य आहेत. त्यांची ही निवड त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि साखर उद्योगातील योगदानाचा गौरव आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : LOMTE SANJIVANI BHIMRAO. TO: LOMATE SANJIVANI BHIMRAO .

Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the LOMATE SANJIVANI BHIMRAO will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :- LOMTE SANJIVANI BHIMRAO.

NEW NAME:- LOMATE SANJIVANI BHIMRAO.

Address :-H.NO.10,SARVE NO.15,SOLAPUR ROAD,NEAR MANAPA SCHOOL NO.207,VITTHALNAGAR,TA. HAVELI,DIST. PUNE CITY,POST.HADAPSAR. DIST.PUNE.-411208.

Adhar no.-897325964312.

Mob. No.-7020086584

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was :- WAJID ALI SHAMSHER ALI SAYYAD TO: - SAYYAD WAJIDALI SHAMSHERALI.

Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SAYYED WAJIDALI SHAMSHERALI will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :- WAJID ALI SHAMSHER ALI SAYYAD.

NEW NAME:- SAYYAD WAJIDALI SHAMSHERALI.

Address :- KALAN GALLI, AUSA.TA. AUSA. DIST. LATUR.-413520.

Adhar no.-376618891254.

Mob. No.-9766602744

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## मॅटवरील कुस्ती स्पर्धेत ३२३ जणांचा सहभाग
## आरळी येथील क्रीडा संकुलात स्पर्धेचे आयोजन




तुळजापूर (शीला उंबरे-पेंढरकर)-तालुक्यातील आरळी बु. येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात आयोजित मॅटवरील शालेय कुस्ती स्पर्धेत १४८ मुली व १७५ मुलांनी सहभाग नोंदवला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय तुळजापूरद्वारा आयोजित तालुकास्तर शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या स्पर्धेत तालुक्यातील ६० पेक्षा अधिक शाळांतील १४८ मुली व १७५ मुलांनी सहभाग नोंदवला.

जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरणाळे, तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार, कुस्तीचे राष्ट्रीय पंच धनराज भुजबळ, राज्यस्तरीय पंच गोविंद घाडगे, उपमहाराष्ट्र केसरी मौला शेख, शिवछत्रपती क्रीडा संकुलाचे प्रमुख संजय पारवे आदींच्या उपस्थितीत मॅट कुस्ती स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी क्रीडा मार्गदर्शन इसाक पटेल, क्रीडा संयोजक राजेश बिलकुले, पंच बबलू धनके, सुंदर जवळगे, कपिल सोनटक्के, गजेंद्र जाधव, केंद्रप्रमुख अनंत हाके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण भागात प्रथमच मॅट कुस्ती स्पर्धा तालुक्यात प्रथमच ग्रामीण भागात मुला मुलींच्या शालेय मॅट कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आरळी बु. येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात नव्याने बांधणी झालेल्या अद्ययावत हॉलमध्ये या स्पर्धा अतिशय दर्जात्मक पद्धतीने संपन्न झाल्या. फौजदार संजय पारवे यांच्यासह आरळी बु. प्रशाला आणि ग्रामस्थांनी या तालुकास्तरीय स्पर्धेला चांगल्या पद्धतीने सहकार्य आणि प्रतिसाद दिला. ग्रामीण भागात प्रचार आणि प्रसार याकरिता या स्पर्धा आरळी येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.

## शहरातील गणेश मंदिरात भजनासह महाप्रसाद वाटपाने संकष्टी साजरी



धाराशिव(प्रतिनिधी)-बुधवार दि.१० सप्टेंबर रोजी पितृपक्षातील तृतीया आणि संकष्ट चतुर्थी एकाच दिवशी विशेष योग जुळून आल्याने धाराशिव शहरातील श्री इच्छापूर्ती गणेश मंदिर, सावरकर चौकातील गणेश मंदिर, पावणारा गणेश मंदिरासह दारफळ येथील श्री संत कोकणे बुवा वारकरी शिक्षण संस्थेत संकष्ट चतुर्थी विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.

धाराशिव शहरातील तुळजापूर रोडवरील श्री इच्छापूर्ती गणेश मंदिरात सकाळी ७ ते ९ पर्यंत अभिषेक, पूजा मंदिराचे पुजारी श्रीपाद जोशी यांच्या हस्ते व भक्तांच्या उपस्थितीत करण्यात आली. त्यानंतर १० वाजेपर्यंत रामकृष्ण हरी सत्संग मंडळातर्फे अथर्वशीर्ष पठण करण्यात आले. यावेळी शामराव दहिटणकर, कुमार व्यास, बंडोपंत जोशी, आर. एस. कुलकर्णी, दीपक कदम, श्रीशैल्य झाडे, बालाजी खोचरे, मुकेश काळे यांच्यासह अन्य गणेश भक्त उपस्थित होते.

दुपारी ३.३० वाजता श्री गजानन महिला भजनी मंडळ, जुना बस डेपोतर्फे भजन केले. भजनावेळी संगीता काळेंसह भजनी मंडळातील अन्य महिला सदस्य उपस्थित होत्या. सकाळी व सायंकाळी मंदिरात आरतीवेळी तसेच दिवसभर दर्शनासाठी भक्तांची गर्दी झाली होती. यासोबतच माणिक चौकातील श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर येथे सकाळी ७ वाजता नियमित पूजा, अभिषेक करण्यात आला. सावरकर चौकातील श्री गणेश मंदिरात पहाटे अभिषेक, त्यानंतर ७ वाजताच्या सुमारास पूजा व त्यानंतर भक्तांना दर्शनासाठी मंदिर खुले केले होते. शहरातील सराफ बाजारपेठेतील रस्त्यालगतच्या पावणारा गणेश मंदिरात सकाळपासूनच पूजेसह दर्शनासाठी अनेक सराफ व्यावसायिकांसह बाजारपेठेतील इतर दुकानदार, गणेश भक्तांची हजेरी दिसत होती. भाजी मंडईतील श्री वडगणेश मंदिरात दुपारीही गणेशभक्त दर्शन घेताना दिसत होते. विविध गणेश मंदिरात रात्री चंद्रोदयानंतर बाप्पांची आरती करून प्रसाद वाटप करण्यात आला.

कोकणे बुवा वारकरी शिक्षण संस्थेत महाप्रसाद दारफळ येथील श्री संत कोकणे बुवा वारकरी शिक्षण संस्था, साधक आश्रम येथे संकष्ट चतुर्थीनिमित्त संस्थेतर्फे ५०० भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. तसेच सायंकाळी ६ वाजता पारंपरिक वाद्याच्या गजरात गावात मिरवणूक काढत बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

यावेळी हभप योगेश बाप्पा इंगळे, संस्थेतील ५० वारकरी विद्यार्थी, गावातील भक्त सहभगी झाले होते. सकाळची आरती संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र रंगनाथ इंगळे यांच्या हस्ते झाली तर सायंकाळची आरती गणेश डक यांच्या हस्ते झाली. यावेळी सरपंच रवी जाधव, हभप योगेश बाप्पा इंगळे, उपसरपंच अनिल जाधव, शशिकांत इंगळे, स्वराज्य भोरे, पवन पांचाळ, धर्मराज जाधव यांच्यासह वारकरी विद्यार्थी, भक्त उपस्थिती होते. सायंकाळी टाळ, मृदुंगाच्या गजरात मिरवणूकीनंतर गणेशाचे विसर्जन केले.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHAIKH AKHEEL BASHEER**
TO: - **AKHILAHEMAD BASHIRAHEMAD SHAIKH.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **AKHILAHEMAD BASHIRAHEMAD SHAIKH** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SHAIKH AKHEEL BASHEER.**
NEW NAME:- **AKHILAHEMAD BASHIRAHEMAD SHAIKH.**
Address :- SANT SAIBABA HIUSING SOCIETY, BACK SIDE TULJAOUR NAKA, OSMANABAD.413501.
Adhar no.-423418742465.
Mob. No.-8484939466


# निम्न तेरणाची उंची वाढवण्यासाठी १इंचही जमीन संपादित करू देणार नाही : ७५ टक्के जमिनी अगोदरच दिल्या!



लोहारा(प्रतिनिधी) -माकणीच्या निम्न तेरणा धरणाची उंची वाढवण्यासाठी शेतकऱ्याची एक इंच जमीनही संपादित करू देणार नाही. या धरणाची उंची वाढवून या भागातील शेतकऱ्यांना भूमिहीन होऊ देणार नाही. त्यासाठी कोणतीही किंमत मोजायला आम्ही तयार आहोत, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी सोमवारी (दि. ८) दिला आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून त्यांना भूमिहीन करून त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट करून जर शासन ही योजना राबवणार असेल तर त्यासाठी पडेल ते कष्ट आणि वाटेल ती किंमत मोजून मात्र धरणाच्या उंचीसाठी शेतकऱ्याची एक इंचही जमीन घेऊ देणार नाही, असा शासनाला अनिल जगताप यांनी इशारा दिला आहे.

या धरण परिसरातील शेतकऱ्यांनी पूर्वीच आपल्या ७५ टक्के जमिनी या धरणासाठी दिलेल्या आहेत. उर्वरित २५ टक्के जमिनीवर शेतकरी उदरनिर्वाह करतो. धरणाची उंची वाढली तर शेतकऱ्यांना भूमिहीन व्हावे लागेल. उदरनिर्वाहाचे साधन राहणार नाही. म्हणून या भागातील शेतकऱ्याचा बेलकुंड उपसा सिंचन योजनेला विरोध आहे. राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने २२ ऑगस्ट रोजी एक परिपत्रक काढून १९० कोटी रुपयांच्या बेलकुंड उपसा सिंचन योजनेला मान्यता दिली आहे. या उपसा सिंचन योजनेमुळे बेलकुड व परिसरातील दहा ते पंधरा गावातील सात हजार एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. या उपसा सिंचन योजनेसाठी जवळपास ११ दशलक्ष घनमीटर पाणी निम्न पेरणा प्रकल्पातील आरक्षित आहे.

निम्न तेरणावर अशा आहेत उपसा सिंचन योजना या निम्न तेरणा प्रकल्पावर ६००० हेक्टरचे सिंचन क्षेत्र येते. त्यासाठी ४६ दशलक्ष घनमीटर पाणी आरक्षित आहे. निम्न पेरणा प्रकल्पावरती उजवा व डावा कालवा आहे त्यातून जवळपास ११,६०० हेक्टर सिंचन क्षेत्र ओलीताखाली येते. त्याच्यासाठी जवळपास ८५ दशलक्ष घनमीटर पाणी लागते. शिवाय निलंगा, उमरगा व लोहारा शहराचा पाणीपुरवठा योजना आहेत. तसेच या धरणावरून लोहारा उमरगा औसा या तालुक्यातील खेडेगावाच्या पाणीपुरवठा योजना आहे. लोकमंगल कारखान्यासाठी देखील याच धरणातून पाणी आरक्षित आहे. या सर्व पाणी आरक्षणाचा विचार केला तर ते जवळपास १४० दशलक्ष घनमीटरच्या पुढे जातील. आणि धरण पूर्ण क्षमतेने भरले तर त्याची पाणी क्षमता ८५ दशलक्ष घनमीटर आहे. याचा अर्थ धरण पूर्ण क्षमतेने भरले तरी ५५ दशलक्ष घनमीटर पाणी कमी पडते. आता त्यात नवीन बेलकुंड उपसा सिंचन योजनेची पाणी आरक्षण टाकायचे म्हटले तर ते पाणी कुठून आणणार असा प्रश्न आहे. प्रसंगी न्यायालयालयीन लढा लढू सत्तेच्या जोरावर शासनाने ही योजना रेटून नेण्याचा प्रयत्न केल्यास जनआंदोलनाबरोबर न्यायालयीन मार्गाचा अवलंब करण्यासाठी मागेपुढे पाहणार नसल्याचे अनिल जगताप यांनी सांगितले.

उंची वाढवण्याबाबत निर्णयात म्हटले २२ ऑगस्ट २०२५ रोजी राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने तीन अटी टाकून या उपसा सिंचन योजनेला मान्यता दिलेली आहे. त्यात अट क्रमांक तीननुसार १६ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार धरणाची सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी व नंतर ही उपसा सिंचन योजना राबवण्यात यावी, असे म्हटले आहे याचा अर्थ धरणाची उंची वाढवावी लागेल.


लातूर समाचार उस्मानाबाद
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


## विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा: श्रीकृष्ण महाविद्यालयात गुणवंताच्या सन्मानप्रसंगी हानेगावे



गुंजोटी (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासून आपली प्रगती करावी. या तरुण वयात विद्यार्थ्यांनी आपल्या वयाचे भान ठेवून योग्य मार्गाने वाटचाल करणे गरजेचे असल्याचे मत ज्येष्ठ व्याख्याते, कवी सतीश हानेगावे यांनी मांडले. उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार गुरुवारी (दि. ११) करण्यात आला. या वेळी आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर हिरवे होते.

प्रास्ताविक श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य कल्लया स्वामी यांनी केले. श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय व व्होकेशनल विभागातील अकरावी प्रवेशित विद्यार्थी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रा. टी. एम. माने यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मारुती खमितकर यांनी आभार मांडले. यावेळी बोलताना प्रशालेचे मुख्याध्यापक रविराज पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या आज्ञाचे पालन करावे, वेळेचे आणि शिस्तीचे पालन करावे. मोबाईलच्या आहारी न जाता अभ्यासाकडे लक्ष द्यावे. वाचनाकडे लक्ष द्यावे. असे आवाहन केले. तसेच पालकांनी आपल्या पाल्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यांना मैदानी खेळ, पारंपरिक संस्कृती जपणे, वक्तृत्व तसचे त्यांच्याकडे असणाऱ्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. यामुळे पाल्यांचे भविष्य उज्वल होईल. अलिकडच्या काळात मानवी जीवनात धावपळ वाढली आहे. यामध्ये पालकांनी रिकाम्या वेळेत मोबाईल न वापरता आपल्या पाल्यांना इतिहासातील गोष्टी, सामान्य ज्ञान अशा विविध गोष्टींची माहिती द्यावी असे आवाहन मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक रविराज पाटील यांनी यावेळी केले. कार्यक्रमास सहसचिव मंदाकिनी पाटील, सदस्य वैशालीताई कदेरे, संगय्या स्वामी, सुधाकर सूर्यवंशी, श्रीकृष्ण वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

मोबाइलच्या ओघास विद्यार्थी संस्कृती विसरत आहेत या वेळी हानेगावे म्हणाले, आई-वडिलांबरोबरच स्वतःचे स्वप्न साकार करायचे असेल तर विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर अहोरात्र परिश्रम करणे गरजेचे आहे. मोबाइलच्या ओघात विद्यार्थी आपली संस्कृती, नातेसंबंध विसरत आहेत. त्यासाठी महापुरुषांच्या जीवनचरित्रांचे वाचन विद्यार्थ्यांनी करावे.

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649